वाचले : १) महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम ३ (१)
२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५६(२) फ
३) महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल ) नियम १९७९ नियम ४ (१) अ
४) महिला तक्रार निवारण समिती अहवाल दि. ०२/११/२०२२
५) विधानसभा अतारांकित प्रश्न क्र. ७१६०६ दि.२३/११/२०२३
६) या कार्यालयाकडील क्र. शिक्षण/आस्था/१ /कावि/१४/२०२४ दि. ०४/०१/२०२४
७) मध्यवर्ती तक्रार निवारण समिती कामगार कल्याण विभाग यांचेकडील क्र.काक/६/कावि/१३४/२०२४ दि.०७/१०/२०२४
८) मा.आयुक्त सो, यांचेकडील दि.२९ /१०/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -१८ शिक्षण विभाग प्राथमिक
जा.क्र. शिक्षण/आस्था/१ /कावि/ ४८४/२०२४
दिनांक : २९ /१० /२०२४

विषय :- सेवानिलंबित करून विभागीय चौकशी सुरु करणेबाबत...
श्री. संजय दासा येणारे, पदवीधर शिक्षक

आदेश ,

ज्याअर्थी, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभाग या आस्थापनेवर श्री. **संजय दासा येणारे**, हे बो-हाडेवाडी प्राथ.शाळा, क्र.१३ पुणे. येथे पदवीधर शिक्षक (वर्ग-क) या पदावर कार्यरत आहेत. शिक्षण विभागातील शैक्षणिक सेवा ही महत्वपुर्ण सेवा असुन शैक्षणिक सेवेत कार्यरत कर्मचारी/अधिका-यांनी नेहमी दक्ष राहुन कार्यालयीन कर्तव्य जबाबदारीने पार पाडणे आवश्यक असुन आपले अधिनस्त कार्यरत महिला कर्मचा-याशी नेहमी सौहादपुर्वक व जबाबदारीने वागणे अभिप्रेत आहे. ज्याअर्थी शिक्षण विभागातील श्रीम.सुजाता आरुडे, या उपशिक्षिकेने त्यांचे शाळेतील श्री.संजय येणारे या प्रभारी मुख्याध्यापक विरोधात कार्यालयाकडे तक्रार दाखल केली आहे.

आणि ज्याअर्थी, उपरोक्त बाबीची प्राथमिक चौकशी करणेकरिता प्रस्तुतचे प्रकरण वाचले क्र ६ अन्वये महिलांचे कामाचे ठिकाणी लैगिक छळापासुन सरंक्षण (प्रतिबंध, मनाई, निवारण) अधिनियम २०१३ नुसार मध्यवर्ती महिला तक्रार निवारण समितीकडे (विशाखा) पाठविणेत आलेले होते. समितीने वाचले क्र ७ अन्वये सादर केलेल्या अहवालानुसार प्रतिवादी हे पदाचा गैरवापर करून सहकारी कर्मचा-यांशी मनमानी पद्धतीने वागतात.तसेच प्रतिवादी यांच्या वर्तणुकीबाबत महिला अधिकारी व सहकारी यांच्या अनेक तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. व प्रतिवादी यांनी पदाचा दुरुपयोग केल्याचा दिसून येत आहे. तसेच तक्रारदाराने केलेली तक्रार संयुक्तिक वाटते. आणि तक्रारदाराने त्यांच्याकडे सोपविलेले काम योग्यरित्या करणे आवश्यक आहे. या अशा त्यांच्या गैरवर्तनावरुन श्री.संजय येणारे यांचा कामाच्या ठिकाणी महिलांकडे पाहण्यांचा दृष्टीकोण विकृत स्वरुपाचा असल्याचे दिसुन येत आहे. एकदरीत तक्रारदार यांनी केलेल्या तक्रारीत तथ्य असल्याचे निदर्शनास येत असल्याचा अंतिम निष्कर्ष महिला तक्रार निवारण समितीने नोंदवुन प्रतिवादी यांचेविरुध्द नियमाधीन प्रशासकीय कारवाई करणेची शिफारस केलेली आहे.

**आणि ज्याअर्थी, श्री.संजय येणारे , पदवीधर शिक्षक** यांनी महिलांशी उपरोउल्लेखित नमुद गैरवर्तन करुन कार्यालयीन शिस्तीचा व नियमाचा भंग करीत असल्याची बाब सकृतदर्शनी निदर्शनास येत आहे. त्यांचे उद्‌धृत गैरवर्तनामुळे कार्यालयीन शिस्तीवर गंभीर प्रतिकूल परिणाम होण्याचा संभव आहे. त्यांनी नेमुन दिलेल्या कर्तव्यात नितांत सचोटी व कर्तव्यपरायणता न राखता, त्यांनी पदाचा दुरुपयोग करुन गंभीर स्वरुपाचे गैरबर्तन केल्याची बाब स्पष्ट होत आहे. त्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम ३(१) (एक) (दोन) (तीन) व कामाच्या ठिकाणी महिलांचा लैगिंक छळ (प्रतिबंध, मनाई, निवारण) अधिनियम २०१३ मधील अधांतर्गत तरतुदीचा भंग केल्याच्या निष्कर्षाप्रती मी आलेलो आहे.

त्याअर्थी, मी. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, उद्‌धृत अशोभनीय गैरवर्तन प्रकरणी, मध्यवर्ती महिला तक्रार निवारण समितीचा अहवाल व त्यातील नमुद शिफारशी, प्रकरणी त्याचेविरुध्द गैर वर्तणुकीतबाबत लैगिक सतावणुकीची श्रीम. सुजाता आरुडे उपशिक्षिका आणि इतर सहकारी उपशिक्षिका यांचे प्राप्त तक्रार विचारात घेता, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ४ (१) (अ) चे अर्थातर्गत तरतुदीनुसार, श्री.संजय दासा येणारे, पदवीधर शिक्षक यांना प्रस्तुत आदेशाचे दिनांकापासून तात्काळ सेवानिलंबीत करण्यात येत असून, त्यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ नुसार विभागीय चौकशी सुरु करण्यास मान्यता देत आहे.

निलंबन कालावधीत श्री.संजय दासा येणारे, पदवीधर शिक्षक यांना पुढील अटी व शर्तीच्या अधीन निर्वाह भत्ता अदा करण्यात येईल.

१) त्यांना सेवानिलंबनाचे पहिले ३ महिने कालावधीसाठी अर्धवेतनी रजेवर असतांना जितके रजा वेतन मिळाले असते त्या रजा वेतनाइतकी निर्वाहभत्त्याची रक्कम आणि त्या व्यतिरिक्त अशा रजा वेतनावर आधारित महागाई भत्ता व त्यावर आधारित अर्जित रजेच्या काळात अनुज्ञेय असलेले भत्ते त्या प्रमाणात उपजिविका भत्ता म्हणून देण्यात येईल

२) सेवानिलंबन काळात त्यांना अन्य कोणत्याही ठिकाणी नोकरी अगर अन्य कोणताही व्यवसाय करता येणार नाही.

३) दरमहा उदरनिर्वाह भत्ता मिळणेकामी त्यांनी अन्य कोणत्याही ठिकाणी सेवा, नोकरी, व्यवसाय केला नाही असा दाखला दरमहा २० तारखेच्या आत स्वतःच्या सहीने प्राथमिक शिक्षण विभाग येथे दिला पाहिजे, म्हणजे पुढील महिन्याचे एक तारखेस त्यांना उदरनिर्वाह भत्ता देण्यात येईल.

४) दर महिन्याचे २० तारखेपर्यंत दाखला हजर न केल्यास उदरनिर्वाह भत्ता अदा केला जाणार नाही व भत्ता अदा करणेस विलंब झाल्यास त्यास महापालिका जबाबदार राहणार नाही.

५) सेवानिलंबन काळात त्यांनी कार्यालयात अगर कार्यालयाचे आवारात गैरवर्तन केल्याचे आढळून आल्यास ते त्यांचे गंभीर स्वरुपाचे गैरवर्तन समजण्यात येऊन त्याबाबत त्यांचेविरुध्द पुढील शिस्तभंगविषयक कारवाई अलहिदा केली जाईल.

६) निलंबन काळात त्यांचे मुख्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका व प्राथमिक शिक्षण विभाग असे राहील. त्यांना वरिष्ठांचे परवानगीशिवाय मुख्यालय सोडून जाता येणार नाही

७) प्रस्तुत आदेशाची नोंद त्यांच्या सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी

(शेखर सिंह)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८

प्रति,
१. श्री.संजय दासा येणारे, पदवीधर शिक्षक , प्राथमिक शिक्षण विभाग
प्रत.
१. मुख्याध्यापक, बो-हाडेवाडी प्राथ.शाळा, क्र.१३

२/- प्रस्तुत आदेश श्री.संजय दासा येणारे, पदवीधर शिक्षक यांना तात्काळ बजाविणेत येवुन, त्यांचेविरुध्द १५ दिवसांत दोषारोपपत्र ठेवण्याची कार्यवाही करावी. प्रकरणी विलंब झाल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७२ (क) चे अर्थातर्गत तरतुदीनुसार नियमाधिन प्रशासकिय कार्यवाही करणेत येईन.
२. सामान्य प्रशासन टेबल क्र १,१२,२२, सामान्य प्रशासन संगणक कक्ष,
३. प्राथमिक शिक्षण विभाग.
४. कामगार कल्याण विभाग (मध्यवर्ती महिला तक्रार निवारण समिती)